नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 09/05/2023 (मंगळवार) दुपार

## अवैधरीत्या शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला अटक
## —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण ची कारवाई :—

दि. ०८/०५/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलीस स्टेशन खापरखेडा हद्दीत पेट्रोलिंग करीत असता गुप्त बातमीदारांकडुन माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन खापरखेडा हद्दीत सिल्लेवाडा येथे राहणारा सुरेश प्रजापती हा आपले जवळ अवैधरीत्या अग्नीशस्त्र (माऊजर) बाळगून रात्री दरम्यान काहीतरी गंभीर गुन्हा करण्याचे उद्देशाने मोटार सायकलने फिरत आहे यावरून **आरोपी नामे— सुरेश बिजाधर प्रजापति, वय ३५ वर्ष, सिल्लेवाडा** यास नाकाबंदी करून त्याला थांबवुन त्याची पंचाचे समक्ष अंगझडती घेतली असता त्याचे ताब्यातुन १) एक माऊजर दोन कारतुस सह मिळुन आला. सदर हत्यारा बाबत आरोपीला परवाना विचारला असता त्याच्या जवळ कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे मिळुन आले नाही. आरोपीच्या ताब्यातुन १) एक माऊजर दोन कारतुस सह किंमती अंदाजे ४०,०००/—रू. २) दोन कारतुस किंमती अंदाजे २०००/—रु. ३) एक मोटारसायकल किंमती अंदाजे १५,०००/—रु. असा एकूण ५७०००/—रुपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध पोलीस स्टेशन खापरखेडा येथे कलम ३, २५ ऑर्म ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात परी. पोलीस अधिक्षक अनिल म्हस्के, परी. पोलीस उपअधीक्षक राहुल झालटे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक अनिल राऊत, पोलीस हवालदार विनोद काळे, नाना राऊत, ईकबाल शेख, पोलीस नायक विरू नरड, मोनु शुक्ला यांचे पथकाने केली.



## जिवानीशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. उमरेड :– फिर्यादी नामे– पोउपनि प्रशांत सुदाम खोब्रागडे, वय ३२ वर्ष पो.स्टे. उमरेड यांच्या रिपोर्ट वरुन पो. स्टे. उमरेड येथे ९६/१९ कलम ३५३, ३३३, ३०७, ३४ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

फिर्यादी हे पोलीस स्टेशन उमरेड येथे पोलीस उपनिरीक्षक या पदावर कार्यरत असुन यातील फिर्यादी हे रात्र गस्त करीत असतांना ट्रक MH-31 CQ 1121 चा चालक **आरोपी नामे– महेश शिवदर उईके, वय ३२ वर्ष रा. मारई ता. परासिया जि. छिंदवाडा (एम पी) ह. मु. अमित मानुसमोर खरबी नागपूर +३ आरोपी** यांना थांबण्याचा ईशारा केला असता ट्रक चालकने गाडी न थांबवता निघुन गेला. जखमीने ट्रकचा पाठलाग करून ट्रक थांबवुन विचारपुस करण्याकरीता ट्रकच्या पायदानवर चढला असता ट्रक चालक ने ट्रक चालु करून ट्रक एक कि.मी. भरधाव वेगाने चालवुन जखमीला ढकलुन जिवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणाचे तपास पोनि. सुधाकर धंगोरे पो. स्टे. उमरेड यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक ०९/०५/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश डी.जे–०५ अली सा. यांनी वरील नमुद आरोपी क्र. १ व २ यांना कलम ३५३ भादवि. मध्ये ६ महिने सश्रम कारावास व प्रत्येकी ५०००/– रू. दंड, दंड न भरल्यास २ महिने साधा कारावास तसेच कलम ३३३ भादवि. मध्ये १ वर्ष सश्रम कारावास व प्रत्येकी ५०००/– रू. दंड, दंड न भरल्यास ६ महिने साधा कारावास व इतर दोन आरोपी निर्दोष रिहा आहे.

सरकारचे वतीने एपीपी गौरकर यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोना/४८७ माधवराव काळे पो.स्टे. उमरेड यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर